# महापारेषण समाचार

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

CIN No.U40109MH2005SGC153646

▪ वर्ष : ११ अंक : ४ पाने : १२ ▪ जून-जुलै २०१७

www.mahatransco.in


*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

आपण आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत प्रवेश करत असून या तिमाहीत माझे कर्मचारी व अधिकारी चांगली कामगिरी करतील असा मला विश्वास आहे. आपल्या कामाचे 'लक्ष्य' पूर्ण करणे, ही आपली जबाबदारी आहे, असे प्रत्येकाला वाटणे गरजेचे आहे. आपण भाग्यवान आहोत, की आपण अशा क्षेत्रात आहोत, ज्याची गरज सतत वाढतच जाणार आहे. विजेची ही वाढती मागणी म्हणजे आपल्याला दररोज चांगले काम करण्याची संधी आहे. त्यासाठी महापारेषण कंपनीची यंत्रणा आपण किती सुसज्ज ठेवतो आणि विजेचा अविरत पुरवठा यावर आपण प्रगती किती लवकर गाठू शकतो, हे अवलंबून आहे. यासाठी महानिर्मिती व महावितरण

- *दुसऱ्या तिमाहीत कर्मचारी व अधिकारी चांगली कामगिरी करतील, असा विश्वास*
- *लक्ष्य (Targets) पूर्ण करण्यासाठी टीमवर्कची गरज*
- *पावसाळ्यात संचालन करताना दक्षता घ्यावी*
- *जीवित व वित्तीय हानी होता कामा नये*
- *क्वालिटी आणि क्वॉटिंटी दोन्हींचे महत्त्व ओळखा*

कंपन्यांशीही सतत समन्वय ठेवण्याची गरज आहे.

सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळ्यात संचालन करताना अनेक प्रश्न उद्भवतात. त्यासाठी अधिक दक्षतेने यंत्रणा सुसज्ज ठेवली पाहिजे. या काळात काही समस्या उद्भवणार नाही, याची काळजी प्रत्येक युनिटने घेतली पाहिजे. पावसाळ्यात प्रकल्पाची कामे मंदावत असली तरी इतर पाठपुराव्याची कामे मोठ्या जोमाने व गतीने आपण करू शकतो. ती आता केली गेली तर वर्षभर आपण अधिक चांगली सेवा देऊ शकतो. त्यामुळे पाठपुराव्याच्या कामाला तेवढेच महत्व आहे, हे लक्षात ठेवा.

आपण जी सेवा देतो किंवा जी कार्यप्रणाली वापरतो, ती अनेकदा आपल्या वर्षानुवर्षे अंगवळणी पडलेली असते. पण त्या कार्यप्रणालीत सतत सुधारणा करून ती सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक अभियंता व अधिकाऱ्यांची आहे. त्यादृष्टीने आपण किती विचार करतो, याचा प्रत्येकाने आढावा घ्यावा आणि कार्यप्रणालीत कोणत्या सुधारणा करता येतील, याविषयी पुढाकार घ्यावा. अशा पुढाकाराचे संस्था स्वागत करेल, ही खात्री आपण सर्वांनी बाळगावी,अशी माझी विनंती आहे. देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या या संस्थेत काम करताना आणखी काही मूलभूत गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. त्यातील पहिली म्हणजे आपली दररोजची कामे नियमित आणि वेळेत होतात का? ते करताना जीवित व वित्तीय होणार नाही, यासाठी आपण विशेष आणि सतत प्रयत्न करत आहोत ना? आपण आपल्या कंपनीच्या एका मोठ्या व्यवस्थेचा महत्वाचा भाग आहोत, त्यामुळे माझे काम महत्वाचे नाही, अशी भावना कोणाच्याच मनात असता कामा नये. आपण करत असलेल्या कामामुळेच कामांची एक दीर्घ साखळी पूर्ण होत असते, हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे.

गेल्या १४ जून २०१७ रोजी मा. ऊर्जामंत्री यांनी आढावा घेऊन आपल्याला मार्गदर्शन केले. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार कामे केली असता भविष्यातील आव्हानास तोंड देणे सुलभ होईल. मा. मंत्रिमहोदयांनी महापारेषणच्या जुन्या व बिकट समस्या सोडविण्याविषयी हस्तक्षेप करून त्या मार्गी लावल्या. अनेक रखडलेले प्रकल्प त्यामुळे उभे राहण्यास मदत झाली. त्यांनी दिलेल्या पाठबळ व मार्गदर्शनामुळे आपले योगदान अधिक दिले पाहिजे. त्यामुळे आता आपली जबाबदारी आणखी वाढली आहे.

या तिमाहीतील आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे प्रशिक्षण धोरण-२०१७ कार्यान्वित होत आहे. त्यानुसार प्रत्येकाने प्रशिक्षण घेऊन कार्यनिपुणता आणली पाहिजे. आपल्याला नवे काही शिकण्याची ही एक संधी आहे आणि अशी संधी पुनःपुन्हा मिळत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. Sub-Station Automation/



**राजीव कुमार मित्तल**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

स्काडा, ERP अंतर्गत अनेक प्रकल्प मूळ रूपामध्ये येत आहेत, या आपल्या दृष्टीने महत्त्वाच्या घडामोडी आहेत. हे सर्व नवे तंत्र आत्मसात करून लवकरात-लवकर कार्यान्वित केले असता त्याचा फार चांगला दूरगामी परिणाम प्रणालीवर होऊ शकतो. आता तिमाहीत कामाचे नियोजन करणे, त्यात सुधारणा करणे, आणि झालेल्या कामाचे मूल्यमापन करणे, अशी सवय आपण आपल्याला लावून घेतली पाहिजे. आधुनिक जगात Quality आणि Quantity अशा दोन्ही गोष्टींचे महत्व वाढले आहे. त्यामुळे आपले कार्य Qualitatively and Quantitatively चांगले असणे गरजेचे आहे. खरे म्हणजे त्याशिवाय आता पर्यायच राहिलेला नाही. आधुनिक जगातील हा बदल आपण जितका लवकर आणि जितका चांगला समजून घेऊ, तितका आपल्या कामातील आपला सहभाग वाढेल, असा उस्फूर्त सहभाग या तिमाहीतही आपण द्याल, याची मला खात्री आहे.

शुभेच्छांसह..!

**- राजीव कुमार मित्तल**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**मुंबई :** ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी महावितरण आणि ईईएसएल यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. याप्रसंगी केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. पीयूष गोयल, राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार.

# उपसा सिंचन योजना सोलरवर आणणार : पीयूष गोयल

*टीम महापारेषण, मुंबई*

- *प्रकल्प अहवाल तात्काळ सादर करा : मुख्यमंत्री*
- *मुख्यमंत्री-केंद्रीय ऊर्जामंत्र्यांची आढावा बैठक*
- *सौर कृषी वाहिनी योजनेला गती द्या : मुख्यमंत्री*
- *महावितरण-ईईएसएलमध्ये सामंजस्य करार*

राज्यातील एक हजार उपसा जलसिंचन योजना सोलर पार्कच्या माध्यमातून सौर ऊर्जेवर आणण्यासाठी लागणारे सहकार्य केंद्र शासन देणार असल्याचे केंद्रीय ऊर्जामंत्री पीयूष गोयल यांनी एका आढावा बैठकीत सांगितले. या संदर्भातील प्रकल्प अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी महावितरण आणि ईईएसएल यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करारही यावेळी झाला. याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानावर महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी आढावा घेतला. ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

राज्यातील उपसा जलसिंचन योजनांना चोवीस तास वीजपुरवठा करण्याची मागणी आहे. तसेच सवलतीच्या दरात वीजपुरवठा व्हावा, अशीही अपेक्षा असताना जास्तीत जास्त उपसा सिंचन योजना सौरऊर्जेवर आणल्या जाव्यात. सौरऊर्जेवर या योजना आणल्या तर किमान १२ तास सौरऊर्जेवर या योजना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वीजबिलातही उपसा सिंचन योजनांना दिलासा मिळेल, याकडे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले होते.

तसेच राज्याची ऊर्जाक्षेत्रात अधिक प्रगती आणि सहकार्य मिळावे म्हणून ईईएसएल या केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या संस्थेशी महावितरणचा सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत ईईएसएलतर्फे एनर्जी इफिशिएन्सी पंप पुरविण्यात येणार आहेत. सुरुवातीला हा प्रकल्प प्रायोगिक स्तरावर राबविण्यात येणार आहे. या सामंजस्य करारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार, ईईएसएलतर्फे सौरव कुमार यांनी स्वाक्षरी केली. केंद्राकडे प्रलंबित असलेल्या ऊर्जा विभागाच्या अडचणी व समस्या सोडविण्यात येतील, असेही केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी यावेळी सांगितले. तसेच ईईएसएलच्या सहकार्याने राज्यातील सबस्टेशनच्या जागेवर सौर प्रकल्प उभारून त्यात निर्माण होणारी वीज कृषी पंपांना देण्यात येणार आहे.


राज्यात ग्रामीण भागात गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले आहे, अशा ठिकाणी सौर ऊर्जेद्वारा विद्युतीकरण करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या योजनेच्या कामाला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

राज्यातील नंदुरबार, मेळघाट, गडचिरोली यासारख्या आदिवासी भागात स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही अजून वीज पोहोचली नाही. सर्वांसाठी वीज या धोरणानुसार आदिवासी कुटुंबांनाही वीज कनेक्शन मिळावे असा ऊर्जामंत्री बावनकुळे यांचा प्रयत्न आहे. सुमारे १० लाख कुटुंबांना वीज देण्यासाठी लागणारे सहकार्य केंद्र शासनातर्फे देण्यात येईल, असेही केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले. या बैठकीला वित्त विभागाचे अवर सचिव सर्वश्री डी. के. जैन, उद्योग विभागाचे अप्पर मुख्य सचिव सुनील पोरवाल, प्रधान सचिव (ऊर्जा) अरविंद सिंह, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक राजीव कुमार मित्तल, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार उपस्थित होते.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## महापारेषणचा संकल्प

नियोजन प्रकल्प अंमलबजावणी, संचलन क्षमता आणि कामगिरी याबाबतीत एक आदर्श राज्य पारेषण उपक्रम आणि परवानाधारक पारेषण कंपनी म्हणून स्वतःला प्रस्थापित करणे आणि असे करताना खर्च आणि गुणवत्ता याबाबतीत जागरुकता, मानव संसाधनविषयक प्रगती आणि सांघिक सामाजिक जबाबदारी यावर भर देणे.



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन, ऊर्जामंत्री यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

# 'विश्वासमत मनाला भिडणारे मत' पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबई :** एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री.विश्वास पाठक यांच्या विश्वासमत मनाला भिडणारे मत पुस्तकाच्या दोन खंडांचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, याप्रसंगी ऊर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावार, डॉ. श्री. विजय चौथाईवाले, श्री. उल्हास लाटकर, लेखक श्री. विश्वास पाठक.



**मुंबई :** एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री.विश्वास पाठक यांच्या `विश्वासमत मनाला भिडणारे मत` पुस्तकाच्या दोन खंडांच्या प्रकाशन सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, याप्रसंगी ऊर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा राज्यमंत्री श्री. मदन येरावार, डॉ. श्री. विजय चौथाईवाले, श्री. उल्हास लाटकर, लेखक श्री. विश्वास पाठक




**मुंबई :** पुस्तक प्रकाशन सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची एक प्रसन्न भावमुद्रा.

■ *टीम महापारेषण, मुंबई*

एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री.विश्वास पाठक यांनी सामाजिक, राजकीय,आर्थिक अशा विविध क्षेत्रातील घडामोडींवर लिहिलेल्या `विश्वासमत मनाला भिडणारे मत` या पुस्तकाच्या दोन खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. मुंबईतील मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात २८ जुलै २०१७ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास हा दिमाखदार प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी ऊर्जामंत्री मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा राज्यमंत्री मा.ना.श्री. मदन येरावार, भा.ज.पा. चे विदेश विभाग प्रभारी मा.डॉ. विजय चौथाईवाले, अमेय इन्स्पायरिंग बुक्स पुणेचे प्रकाशक श्री. उल्हास लाटकर उपस्थित होते.

## महापारेषणच्या आढावा बैठकीत विविध विषयांवर चर्चा



**प्रकाशगंगा, मुंबई :** महापारेषणच्या कामांविषयी आढावा बैठक मा.ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावळकुळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सूरज वाघमारे, संचालक श्री. गणपत मुंडे, संचालक (प्रकल्प), श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त), श्री. विनायक साठे इतर अधिकारी व कर्मचारी.



**प्रकाशगंगा, मुंबई :** प्रकल्प, संचालन व सुव्यवस्था, वित्त व लेखा, मा.सं., मुख्य औद्योगिक संबंध विभाग, दक्षता विभाग यांनी तयार केलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सूरज वाघमारे, संचालक संचालक (प्रकल्प), श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त), श्री. विनायक साठे.



## महापारेषणच्या संचालकपदी श्री. गणपत मुंडे यांची नियुक्ती

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या संचालकपदी श्री. गणपत मुंडे यांची निवड झाली. दि.२०.०७.२०१७ पासून ते महापारेषणमध्ये संचालक म्हणून रुजू झाले आहेत.

श्री. मुंडे हे तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये १६.०९.१९८२ मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झाले होते. कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता अशा विविध पदांवर त्यांनी काम पाहिले आहे. पस्तीस वर्षे बांधकाम, उपकेंद्र देखभाल व दुरुस्ती, चाचणी, ५०० केव्ही एचव्हीडीसी या विभागात काम केले आहे.

श्री. मुंडे हे व्हॉलीबॉल, कबड्डी, कुस्ती व बॅडमिंटन खेळाडू म्हणूनही परिचित आहेत. तत्कालीन मंडळाचे व महापारेषण कंपनीचे राष्ट्रीय स्तरावर त्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



**जळकोट जि. लातूर :** औरंगाबाद परिमंडळाअंतर्गत जळकोट येथील २२०/१३२ के.व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे (मंत्री, ऊर्जा, नवीन व नविकरणीय ऊर्जा), मा.ना.श्री. संभाजी दिलीपराव पाटील-निलंगेकर, (मंत्री, कौशल्य विकास, कामगार, भूकंप पुनर्वसन, तथा पालकमंत्री जि.लातूर), आमदार श्री. सुधाकर भालेराव, श्री. मिलिंद लातुरे, जि.प. अध्यक्ष, लातूर, माजी आमदार श्री. गोविंद केंद्रे, श्री. गणपत मुंडे यांच्यासह मान्यवर व अधिकारी वर्ग.


# जळकोटच्या २२०/१३२ के.व्ही. उपकेंद्राचे थाटात भूमिपूजन

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*


महापारेषणच्या औरंगाबाद परिमंडळाअंतर्गत लातूर जिल्ह्यातील जळकोट येथील २२०/१३२ के.व्ही. उपकेंद्राचे भूमिपूजन मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे (मंत्री, ऊर्जा, नवीन व नविकरणीय ऊर्जा, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील-निलंगेकर, (मंत्री, कौशल्य विकास, कामगार, भूकंप पुनर्वसन, तथा पालकमंत्री जि.लातूर) व प्रमुख अतिथी श्री. सुधाकर भालेराव, आमदार, उदगीर, श्री. मिलिंद लातुरे, जि.प. अध्यक्ष, लातूर, माजी आमदार श्री. गोविंद केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

या नियोजित उपकेंद्रामुळे लातूर जिल्ह्यातील १३२ के.व्ही. दाबाच्या चाकूर, उदगीर व अहमदपूर या उपकेंद्रांना आणि या उपकेंद्राव्दारे वीज पुरवठा होणाऱ्या परिसरातील गावांना योग्य दाबाने वीज पारेषित होणार आहे. या नियोजित उपकेंद्राला ४०० के.व्ही. कुंभारगाव (नांदेड) येथून व्दिदल वाहिनीव्दारे जोडले जाणार असल्याने ४०० के.व्ही. दाबाचा दुसरा स्त्रोत लातूर जिल्ह्याला उपलब्ध होणार आहे.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक सर्वश्री गणपत मुंडे, राजेंद्र गायकवाड, अधीक्षक अभियंते श्यामकांत वसेकर, अनिल भारसाकळे, गोविंद जाधव, कार्यकारी अभियंते अशोक गडदे, संजय किंकर, श्री. जाधवर, श्री. कत्राळे तसेच महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. बकुरिया, लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. बुरूड, अधीक्षक अभियंता तालेवाड कार्यकारी अभियंता श्री. अशोक जाधव, महापारेषण/महावितरणचे इतर अधिकारी/कर्मचारी आणि जळकोट तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*महापारेषणची उद्दिष्टे : पुरेशा आणि परवडणाऱ्या अशा आंतरराज्यीय पारेषण प्रणालीसाठी पारेषण जाळ्यांचा विकास करणे गुंतवणुकीसंबंधीच्या योजना बनविणे आणि सर्वोत्कृष्ट प्रणालीचा अभ्यास व नियोजनविषयक क्षमतांचा विकास घडवून आणणे.*





## गौरव राठोड याचे शालांत परीक्षेत सुयश

जून २०१७ च्या माध्यमिक शालांत परीक्षेत इंग्रजी माध्यमातून ९७.२० टक्के गुण मिळवून गौरव बाबुलाल राठोड याने यश संपादन केले आहे. गौरव हा अउदा सं.व.सु. मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित औरंगाबाद येथे कार्यरत असलेले श्री. बाबुलाल नान्हुसिंग राठोड, उच्चस्तर लिपिक (मा.सं.) यांचा सुपुत्र आहे. या य़शाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## रितेश येवले याचे सुयश

सी.बी.एस.ई.नवी दिल्ली मंडळाच्या वतीने मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत रितेश उदय येवले याने ९६.६० टक्के गुण मिळविले आहेत. चि. रितेश हा श्री. उदय भालचंद्र येवले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ नाशिक यांचा सुपुत्र आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.






## कंपनीच्या वाटचालीची अपडेट माहिती

मी 'महापारेषण समाचार'चा नियमित वाचक आहे. महापारेषण समाचारमुळे कंपनीतील विकास आराखडा, आधुनिक युगातील बदल, वीजक्षेत्राच्या विकासाकरिता महत्त्वाच्या भूमिकेविषयी माहिती अवगत होते. आपल्या कंपनीची आगामी उद्दिष्टे याविषयीची माहिती मिळते. महाराष्ट्रातील विविध उपकेंद्रातील उपक्रमांविषयी माहिती मिळते. आपल्या कंपनीने दूरसंचार शाखेच्या व स्थापत्य शाखेच्या अभियंत्यांना पायाभूत प्रशिक्षण (Induction), तज्ज्ञांचे मार्गदर्शन, चर्चासत्रे, प्रात्यक्षिके सुरु केली आहेत. ही बाब खूप गौरवाची आहे. महापारेषण समाचारमुळे कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती याविषयीची माहिती मिळते. मी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा. कार्यकारी संचालक (मासं) यांचे संदेश वाचायला उत्सुक असतो. कंपनीची अपडेट माहिती देणारा महापारेषण समाचार मला हवाहवासा वाटतो.

**- श्री. शामसुंदर महिंद्रकर**
उपव्यवस्थापक (मासं), सांघिक कार्यालय, मुंबई




## माझ्या हक्काचा पेपर

कंपनीची माहिती देणारा महापारेषण समाचार हा माझा हक्काचा पेपर आहे. मी अनेक वर्तमानपत्रेही वाचतो. परंतु, महापारेषण समाचार हा कंपनीची विस्तृत माहिती देणारा माझा पेपर वाटतो. मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे संदेश मला वाचायला मिळतात. मा.कार्यकारी संचालक (मासं) यांचेही संदेश वाचायला मिळतात. त्यांना कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून कामांविषयी अपेक्षा समजते. त्यांची कंपनीविषयची भूमिका समजते. त्यांनी दिलेले लक्ष्य (Targets) आम्ही पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

**- श्री. अनंत पवार,**
उच्चस्तर लिपीक (मासं), ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, गिरवली.

## परिवाराच्या कार्याचा उचित गौरव


महापारेषण हा एक परिवार आहे. त्यामुळे परिवारातील लोकांचे 'महापारेषण समाचार' मध्ये कौतुक होते. नवीन घटना, घडामोडी, विचार वाचायला मिळतात. कर्मचारी-अधिकारी यांच्या पाल्यांचे कौतुक होते, हे मनाला भावणारं आहे. महापारेषण समाचारचा अंक कधी एकदा आमच्याकडे येतो, अशी आम्ही वाटच पाहत असतो. ही आतुरता आम्हाला 'महापारेषण समाचार'ने लावली आहे. खरोखरच, संग्रही ठेवण्यासारखे अंक आहेत. पुन्हा एकदा धन्यवाद..!

**- श्री. पुष्पराज पांगे,**
उपव्यवस्थापक (मासं), रत्नागिरी विभागीय कार्यालय



प्रिय अधिकारी व कर्मचारी, महापारेषणमध्ये होणाऱ्या घटना, घडामोडी, तुम्ही केलेल्या चांगल्या कार्याची माहिती, लेख, कविता महापारेषण समाचारसाठी कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत छायाचित्रांसह prohr@mahatransco.in या ई-मेलवर पाठवा, ही विनंती.

**- संपादक मंडळ**



***महापारेषणची उद्दिष्टे:*** *संबंधित संदेशवहनाची साधने असलेली उच्च दर्जाची राज्य भार प्रेषण केंद्र, अत्याधुनिक आर.टी.यू. व स्काडा पद्धती, माहिती व ज्ञान व्यवस्थापन पद्धती व संचलन कौशल्य विकसित करणे.*



## झाडे लावा, झाडे जगवा..!



# नागपूर कार्यालय आवारात वृक्षारोपण

■ *टीम महापारेषण, नागपूर*

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे १ जुलै रोजी मुख्य अभियंता श्री. मिलिंद बहादुरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाविषयी जागरुकता करण्यात आली. याप्रसंगी श्री. महेश सावंत, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं.) श्री. पीयूष चिक्षे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), सौ. प्रणोती बुंदाले, कार्यकारी अभियंता (प्रशासन) तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## चला, झाडे वाचवुया..!



**वाशी :** परिमंडळात वनमहोत्सवानिमित्त वृक्षारोपण करताना मुख्य अभियंता श्री. संजय शिंदे, याप्रसंगी श्री. भूषण बल्लाळ, सौ. जुईली वाघ, श्री. सतीश गहेरवार, श्री. संदीप कलंत्री, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. मोरेश्वर जांगडे, शीतल गेडाम यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी वर्ग.

# वाशी परिमंडळात वनमहोत्सव उत्साहात

■ *टीम महापारेषण, वाशी*

वाशी परिमंडळात १ जुलै ते ७ जुलै या कालावधीमध्ये वनमहोत्सवानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम मुख्य अभियंता श्री. संजय शिंदे यांच्या हस्ते झाला. स्थापत्य मंडळ, ऐरोली, प्रकल्प मंडळ, कळवा, अउदा संवसु मंडळ, पनवेल, उदादिधा ग्र.कें.संवसु मंडळ, पडघे यांनी मिळून १४९२ झाडे लावली. वृक्षारोपण करण्यासोबतच त्यांचे संगोपन करणेदेखील गरजेचे असल्याचे मुख्य अभियंता श्री. संजय शिंदे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता (स्था), अधीक्षक अभियंते सौ. जुईली वाघ, श्री. सतीश गहेरवार, श्री. संदीप कलंत्री, श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. मोरेश्वर जांगडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) शीतल गेडाम उपस्थित होते.



***महापारेषणची उद्दिष्टे:*** *योजना आखताना, पारेषण जाळ्याचा विस्तार करताना संचलन व सेवा या संदर्भातील सर्व वैधानिक नियंत्रित संकेत, मानके, निर्देश व ध्येये यांची पूर्तता करणे.*





**नंदुरबार :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांचे नंदुरबार येथे स्वागत करताना श्री. जयंत वीके, श्री. सतीश गायकवाड, श्री. अष्टेकर व अधिकारी वर्ग.

# नाशिक परिमंडळास अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची भेट

## बाभळेश्वर येथे केले वृक्षारोपण



४०० केव्ही उपकेंद्र बाभळेश्वर येथे वृक्षारोपण करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, मुख्य अभियंता, श्री. जयंत वीके, श्री. नवलाखे व अन्य अधिकारी व कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, नाशिक*

नाशिक परिमंडळांतर्गत जिल्हा नंदुरबार येथे अऊदा संवसु मंडळ भुसावळ या मंडळ कार्यालयाचा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव कुमार मित्तल यांनी आढावा घेतला. सदर बैठकीस परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, जगन्नाथ चुडे, अधीक्षक अभियंता, अऊदा संवसु मंडळ भुसावळ, सतीश गायकवाड, अधीक्षक अभियंता, अऊदा स्थापत्य मंडळ भुसावळ व संबंधित अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीदरम्यान अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी नंदुरबार जिल्ह्यात पारेषणचे विद्युत वाहिन्यांचे जाळे अधिक मजबूत करण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी नियोजित १३२ केव्ही उपकेंद्र, धडगावच्या जागेची पाहणी केली. १३२ केव्ही उपकेंद्र, नंदूरबार येथेही भेट देऊन उपकेंद्राच्या आवारात वृक्षारोपण केले.

प्रशिक्षण केंद्र, बाभळेश्वर येथे अऊदा संवसु मंडळ, नाशिक यांची नाशिक व अहमदनगर जिल्ह्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस श्री. किशोर जाधव, अधीक्षक अभियंता, अऊदा संवसु मंडळ, नाशिक यांनी माहिती दिली. जिल्हा नाशिक व अहमदनगर अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्र व वाहिन्यांविषयक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी माहिती जाणून घेऊन उपाययोजना सुचविल्या. यावेळी मानव संसाधन व लेखा विभागाशी निगडित मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

४०० केव्ही उपकेंद्र बाभळेश्वर येथे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच नवीन उभारणी केलेल्या ४०० केव्ही आयसीटी-४ ची पाहणी केली. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



*__महापारेषणची उद्दिष्टे :__ उपकेंद्राचा आराखडा, सुव्यवस्था आणि सुरक्षा, संदेशवहन माहितीप्रणालीतील बिघाड ओळखून दुरुस्ती व संवर्धन करणे, आयुर्मयादा वाढविणे, उभारणी आदी बाबींशी संबंधित सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञानाची माहिती मिळवत राहणे.*






**मुंबई :** मानव संसाधनविषयक प्रशिक्षणाच्या उदघाटनप्रसंगी श्री. सूरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन), यावेळी सर्वश्री शशिकांत बाकरे, सुगत गमरे, सुधीर वानखेडे.

# सांघिक कार्यालयात मानव संसाधनविषयक प्रशिक्षण

■ ***टीम महापारेषण, प्रशिक्षण***

सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, मुंबई येथे सहा दिवसांचे मानव संसाधनविषयक प्रशिक्षण दि.१ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत घेण्यात आले. सदर प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम टिप्पणी व पत्रव्यवहाराची कार्यपद्धत, सेवाविनियमातील ठळक तरतुदी, शिस्तभंग कार्यवाहीची पद्धत, भरती विनिमयातील ठळक तरतुदी, कंपनीचे नियम, विनियम, परिपत्रके याबाबतची ओळख, वेतन व देयके विषयक कार्यपद्धत या विषयावर आधारित होता. या प्रशिक्षणाचे उदघाटन श्री. सूरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांच्या हस्ते झाले. यावेळी सर्वश्री सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन), सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन), राजू गायकवाड (उपमहाव्यवस्थापक, मा.सं.) व शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) उपस्थित होते. या कार्यशाळेत तज्ज्ञ व्याख्यात्यांची चर्चासत्रे झाली. मानव संसाधन व वित्त व लेखा विभागातील २५ प्रशिक्षणार्थींनी या कार्यशाळेत भाग घेतला. या कार्यशाळेचे संयोजन श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) यांनी केले.

## इंडक्शन प्रशिक्षण





**जेजुरी, पुणे :** महापारेषण कंपनीव्दारे सरळसेवा भरती योजनेमधून निवड झालेल्या सहाय्यक अभियंता प्रशिक्षणात सर्वश्री शशांक जेवळीकर, जयंत कुलकर्णी, प्रशांत चौधरी, श्री. संजय परदेशी.

# सहाय्यक अभियंता प्रशिक्षणास प्रारंभ


■ ***टीम महापारेषण, प्रशिक्षण***

महापारेषण कंपनीव्दारे सरळसेवा भरती योजनेमधून निवड झालेल्या सहाय्यक अभियंता (पारेषण) यांचे इंडक्शन पातळीवरील प्रशिक्षण दि.३ जुलैपासून कंपनीच्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात सुरू झाले. एकूण सात प्रशिक्षण केंद्रात १३६ सहायक अभियंत्यांना प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. चंद्रपूर येथे नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. मिलिंद बहादुरे उपस्थित होते. जेजुरी प्रशिक्षण केंद्रात श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (पॅक) उपस्थित होते. बाभळेश्वर प्रशिक्षण केंद्रात सांघिक कार्यालयाचे श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.) उपस्थित होते. या मुलभूत प्रशिक्षणात तज्ज्ञ व्याख्यात्यांचे तास, प्रात्यक्षिक वर्ग, शैक्षणिक सहली, योगाभ्यास यांचा समावेश होतो.



***महापारेषणची उद्दिष्टे :*** *संपूर्ण संस्थात कामाची नीती मूल्ये, गुणवत्तेबाबत जागरूकता आणि उत्कृष्ट कामगिरी या बाबी कर्मचाऱ्यांच्या मनावर बिंबविणे.*





**प्रकाशगंगा, मुंबई :** मे. कल्की कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीज (कल्कीटेक), बेंगळूरू यांच्या वतीने महापारेषण कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी व अभियंत्यांसाठी कार्यशाळेत बोलताना सर्वश्री राजीव कुमार मित्तल, रवींद्र चव्हाण, शशांक जेवळीकर, श्यामकांत वसेकर, पीयूष शर्मा.

# स्काडा सबस्टेशन ऑटोमेशन विषयावर कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

मे. कल्की कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीज (कल्कीटेक), बेंगळूरू यांच्यावतीने सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, मुंबई येथे महापारेषण कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी व अभियंत्यांसाठी स्काडा सबस्टेशन ऑटोमेशन विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये ऑटोमेटिक मीटर रीडिंग, डिस्टर्बन्स डेटा कलेक्शन, रिमोट मॉनिटरिंग ऑफ सबस्टेशन या विषयावर चर्चासत्रे झाली. या कार्यशाळेत सर्वश्री राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रवींद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (PAC), अधीक्षक अभियंते व कार्यकारी अभियंत्यांनी सहभाग घेतला. कल्कीटेक कंपनीतर्फे सर्वश्री जॉर्ज पुनुस (C.O.O.), एन.आर.विजू (AVP-Solutions), अंकूर श्रीवास्तव (व्यवस्थापक), मेसर्स आर.एम.असोसिएटसतर्फे श्री. मुकुल ब्रह्मे व क्षितिज जोशी या कार्यशाळेत उपस्थित होते.


# सहाय्यक अभियंता यांचे प्रशिक्षण संपन्न

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

सरळसेवा भरतीव्दारा निवड झालेल्या २४ सहाय्यक अभियंता (दूरसंचार) यांचे इंडक्शन पातळीवरचे प्रशिक्षण दि. २० जुलै २०१७ रोजी घेण्यात आले.

सुरुवातीला दि. २४ एप्रिल ते ३० मे दरम्यान या कालावधीत या अभियंत्यांनी वळूज प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतले. त्यानंतर पुढील एक महिन्यात त्यांनी चाचणी व दूरसंचार मंडळांतर्गत क्षेत्रीय संलग्नता कार्यक्रमात भाग घेतला. पुणे येथील क्षेत्रीय दूरसंचार प्रशिक्षण केंद्रात IP Addressing and Cyber security या विषयावर प्रशिक्षण झाले. सिमेन्स लि. यांच्या ठाणे येथील प्रशिक्षण केंद्रात RTU DC SCADA and SAS या विषयावर दोन दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले. एबीबी इंडिया लिमिटेड यांच्या अंधेरी प्रशिक्षण केंद्रात PLCC and Optical Fiber Communication या विषयावर चार दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (पॅक), शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), पीयूष शर्मा, अधीक्षक अभियंता (पॅक), मिलिंद देवळे, कार्यकारी अभियंता (पॅक) उपस्थित होते.

## इंडक्शन प्रशिक्षण (दूरसंचार)



**बीएसएनएल, चिंचवड :** सरळसेवा भरतीव्दारा निवड झालेल्या सहाय्यक अभियंता (दूरसंचार) यांच्या इंडक्शन पातळीवरच्या प्रशिक्षणातील शिबिरार्थी.



***महापारेषणची उद्दिष्टे:*** *आपला व्यवसाय व संस्था याबद्दल स्वाभिमानाची भावना निर्माण करणे आणि विविध प्रकारची कामे करणाऱ्या गट व समूह यांच्यात मजबूत बंध तयार करणे.*





देवनार : पॉवरग्रीडच्या वतीने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेमध्ये आयोजिलेल्या तीन दिवसीय मानव संसाधन प्रशिक्षण शिबिरामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना 'महापारेषण'चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे व समोर पॉवरग्रीडचे प्रतिनिधी.




प्रशिक्षण शिबिरामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केलेले 'महापारेषण'चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांचा सत्कार करताना पॉवरग्रीडचे प्रतिनिधी.

# पॉवरग्रीडच्या प्रतिनिधींना श्री. सुगत गमरे यांचे मार्गदर्शन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

पॉवरग्रीडच्या वतीने देवनार येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेमध्ये आयोजित केलेल्या तीन दिवसीय मानव संसाधन प्रशिक्षण शिबिरामध्ये 'महापारेषण'चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून पॉवरग्रीडच्या उपस्थित प्रशिक्षणार्थी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. सुरवातीला श्री. गमरे यांचे स्वागत पॉवरग्रीडच्या प्रतिनिधींनी केले. त्यानंतर श्री. गमरे यांनी थेट प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधला. प्रशिक्षणार्थ्यांनी मानव संसाधनाविषयी विचारलेल्या प्रश्नांना श्री.गमरे यांनी समर्पक शब्दात उत्तरे दिली. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी पॉवरग्रीडच्या प्रशिक्षणार्थ्यांनी श्री.गमरे यांचे आभार मानले.



'महापारेषण'चे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांच्यासमवेत पॉवरग्रीडचे प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे जून/जुलै-२०१७

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | मोतीसिंह हिरासिंह चौहान | मुख्य अभियंता (स्थापत्य) | सांघिक कार्यालय, मुंबई | ०१.०७.२०१७ |
| २. | अविनाश मधुकर कोंडावार | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्र.नि.संवसु. परिमंडळ, औरंगाबाद | ३१.०७.२०१७ |
| ३. | शरद जनार्धन लोखंडे | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा, स्था.बां.नि.सु.मंडळ, नाशिक | १२.०७.२०१७ |
| ४. | विलास कृष्णा खाचणे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | २९.०६.२०१७ |
| ५. | श्रीमती ज्योती नितीन चिमटे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | २९.०६.२०१७ |
| ६. | अरविंद बाबूराव दडमल | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा, संवसु मंडळ, कोल्हापूर | २९.०६.२०१७ |
| ७. | प्रवीण प्रल्हाद भालेराव | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | २९.०६.२०१७ |
| ८. | रोहिदास फुलचंद पवार | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | २९.०६.२०१७ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | उमाकांत महादेवराव कावळे | मुख्य अभियंता (स्थापत्य) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०६.२०१७ |
| २. | मिलिंद नामदेव बहादुरे | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्र.नि.संवसु परिमंडळ, नागपूर | ३१.०७.२०१७ |
| ३. | मनोहर रामजी भगत | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा, स्था.बां.नि.सु.मंडळ, नागपूर | ३०.०६.२०१७ |

# “शाबासकी कौतुकाची..!

महापारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी आपले नियमित काम सांभाळून `सुईधागा` नाटकाच्या माध्यमातून कलाकार या नात्याने सादर केलेली कला खरोखरच कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे, नाटकाचे कथानकही अतिशय सुंदर होते. माणसांच्या आयुष्यामध्ये कुटुंबव्यवस्था सुरू झाल्यानंतर एखाद्या वळणावरती अहंकारामुळे घेतलेला निर्णय किती टोकाला जाऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण या नाटकाच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. मी कर्मचारी कलाकारांचे मनापासून अभिनंदन करतो, आणि त्यांना खूप शुभेच्छा देतो...धन्यवाद..!

– श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## सुईधागा...घट्ट वीण नात्यांची!



माटुंगा : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने सादर केलेल्या सुईधागा नाटकातील कलाकार डावीकडून पल्लवी देशपांडे, रूपाली मोहिते, संदीप नाथ, श्याम सावंत.

## ओंकार स्वरूपा...




यावेळी अनुप्रिता जोशी हिने गणेशवंदना सादर केली.



माटुंगा : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वाशी परिमंडळाने सादर केलेल्या `सुईधागा` या नाटकातील कलाकारांचे कौतुक करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सर्वश्री राजीव कुमार मित्तल, संचालक (प्रकल्प), रवींद्र चव्हाण, संचालक गणपत मुंडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) सूरज वाघमारे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.), सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.) सुधीर वानखेडे, अन्य अधिकारी व कर्मचारी कलाकार.

From the Desk of ED, HR






सूरज वाघमारे
कार्यकारी संचालक (मासं)

# कार्यालयीन शिस्त

आपण करत असलेल्या सेवेत म्हणजे नोकरीत कार्यालयीन शिस्तीला अतिशय महत्त्व आहे. आपण सर्व जण मुळात ग्रामीण संस्कृतीतून आल्यामुळे भारतीय समाज हा आतापर्यंत औपचारिक जगातच जगत आला आहे. त्या संस्कृतीत वेळेला आणि शिस्तीला महत्त्व होतेच, पण त्यात एक महत्त्व मोकळेपणाही होता. त्यामुळे त्या गोष्टी जाचक वाटत नव्हत्या. पण, आता मात्र आपल्यातील अनेक जण मोठमोठ्या कार्यालयात नोकरी करत आहेत. तेथील शिस्त आपल्याला जाचक वाटते. त्याचे हे एक कारण असे आहे की, ती आपल्यावर लादली गेली आहे, असे आपल्याला वाटते. आणि जे लादलेले असते, ते माणसाला कधीच नको असते. पण कार्यालयात तर शिस्तीशिवाय पर्याय नाही. मग जुळायचे कसे? त्यासाठी एक मार्ग आहे, तो म्हणजे आपण आता सेवा क्षेत्रात काम करू लागलो आहोत, हे मान्य करणे आणि दुसरी गोष्ट म्हणजे शिस्त ही जशी कार्यालयीन गरज आहे, तशीच ती स्वतःच्या आयुष्याच्या वाटचालीतील गरज आहे, हे मान्य करणे. ती कोणीतरी लादण्याची नव्हे, तर स्वतःहून स्वीकारण्याची गरज आहे, हे एकदा पटले की शिस्तीचा त्रास नव्हे, तर शिस्तीचे समाधान आपल्याला मिळू लागते, एवढेच नव्हे तर आपल्या जीवनप्रवास सुखकारक होण्यामध्ये तिचा आपल्याला खूप फायदा होतो.




वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यात शिस्तीला इतके महत्त्व आहे की, शिस्तीशिवाय व्यक्ती आणि संस्था पुढे जाऊच शकत नाहीत. संस्थांची उभारणी शिस्तीशिवाय होऊ शकत नाही. ग्राहकांच्या मनात त्या संस्थेविषयीची चांगली किंवा वाईट प्रतिमा तयार होण्यात सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरतो, तो शिस्तीचाच. एखादी व्यक्ती किंवा संस्था अचानक शिस्तीचे पालन करणारी झाली, असे कधी होत नाही. तो हळूहळू होणारा संस्कार आहे. घरातील आणि संस्थेतील वरिष्ठ तो संस्कार व्यक्तीवर आणि संस्थेवर करत असते. अशा व्यक्ती आणि संस्था यातूनच देशाचे चारित्र्य घडत असते. या चारित्र्यात शिस्तीला अतिशय महत्त्व आहे, कारण त्यावर देशाचीच उभारणी होत असते. त्यामुळे कार्यालयीन शिस्तीकडे संकुचित अर्थाने न पाहता व्यापक अर्थाने पाहिले पाहिजे आणि त्याची सुरुवात स्वतःपासून केली पाहिजे.

तशी सुरुवात करण्यासाठी आपण आता कार्यालयीन शिस्त म्हणजे नेमके काय, हे काही मुद्द्यांनी समजून घेऊ.

१. कार्यालयात वेळेत येण्याचा आणि कार्यालयीन कामे मार्गी लागण्याचा थेट संबंध आहे. त्यामुळे आपण कार्यालयात वेळेत पोहोचलो पाहिजे.
२. आपला घरातील ड्रेस तसेच वागणे आणि कार्यालयातील ड्रेस तसेच वागणे, यात फरक असतो. त्यामुळे कार्यालयाने त्याविषयी ठरविलेल्या संकेतांचा आदर राखला पाहिजे. कारण त्यातून सांघिकपणाची भावना वाढीस लागत असते.
३. कार्यालयात आपण एक सेवक नावाच्या भूमिकेत प्रवेश करतो. त्यामुळे आपला फोन, आपला संगणक आणि आपल्या फाईल या कार्यालयीन सोयीसाठीच वापरल्या गेल्या पाहिजेत.
४. आपण कार्यालयात शेजारी-शेजारी बसलेलो असतो. आपण मोबाईलवर किंवा आलेल्या नागरिकांशी जोरजोरात बोलायला लागलो तर शेजाऱ्याला त्रास होतो, त्यामुळे हळुवार बोलणे, हा शिस्तीचाच भाग आहे.
५. आपल्याला अनेकदा उच्चपदस्थांकडे जावे लागते. अशा वेळी त्यांची वेळ घेणे, केबिनमध्ये कोणी बसले असल्यास पुन्हा विचारून प्रवेश करणे, ही शिस्त अंगी बाणली पाहिजे.
६. आपल्या हातून होणारी संस्थेची आणि ग्राहकांची कामे ही आपल्या संस्थेची प्रतिमा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे ती वेळच्या वेळी होणे आणि चांगली होणे, ही आपली जबाबदारी आहे.
७. कार्यालयात स्वच्छता राखणे, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आपण जेथे किमान ८ ते १० तास बसतो, तो परिसर आपण स्वच्छ ठेवणार नाही तर कोण?
८. ग्राहक खूप आणि कामावर माणसे कमी, अशी वेळ अनेकदा येते. अशा वेळी ग्राहक ज्या क्रमाने आले आहेत, त्या क्रमाने त्यांची कामे होणे, आवश्यक असते, ती शिस्त आपणच लावू शकतो.
९. आपण जागेवर नसताना आपण नेमके कोठे गेलो आहोत, किंवा किती वेळेत जागेवर येणार आहोत, हे आपल्या सहकाऱ्याला सांगणे आवश्यक आहे.
१०. कागद, वीज, पाणी अशा गोष्टींवर आपल्या संस्थेचा खूप खर्च होत असतो, शिवाय ती राष्ट्रीय संपत्ती आहे. तिचा योग्य आणि नेमका वापर होईल, यावर आपण लक्ष ठेवले पाहिजे.

वरील बाबी फक्त उदाहरणाकरिता असून अशा प्रत्येक लहान-मोठ्या बाबीं की, ज्यामधून आपल्याला आपल्या कंपनीचे हित जोपासता येईल.

शुभेच्छांसह..!

**– सूरज वाघमारे**
**कार्यकारी संचालक (मासं)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.